पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १९०**

(सभावृत्तांत)

**दिनांक – २३/०९/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार दिनांक **२३/०९/२०२०** रोजी **दु.०२.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती.सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा. सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६. मा.कलाटे राहूल तानाजी
७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८. मा.कदम शशिकांत गणपत
९. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
१०. मा.संतोषबबनकांबळे
११. मा.अभिषेक गोविंद बारणे
१२. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१३. मा.फुगे भिमाबाई पोपट
१४. मा.पौर्णिमारविंद्र(आप्पा) सोनवणे
१५. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.पाटील - अति.आयुक्त(१), मा.पवार – अति.आयुक्त(२), मा.तुपे – प्र.अति.आयुक्त(३) तथा सह शहर अभियंता (वि/यां), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.इंगळे – उपआयुक्त, मा.भालकर, मा.सवणे, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.खांडेकर, मा.दुरगुडे, मा.लोणकर, मा.बोदडे – सहाय्यक आयुक्त, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.गट्टुवार, मा.सेठिया, मा.काळे – कार्यकारी अभियंता, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.गोफणे – आरोग्य अधिकारी हे अधिकारी सभागृहात

उपस्थित राहून तसेच मा.पाटील – शहर अभियंता, मा.कुंभोजकर – मुख्य लेखा परिक्षक, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.निकम – सह शहर अभियंता, मा.झगडे– सहाय्यक आयुक्त, मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.कुलकर्णी, मा.पुजारी, मा.मोरे, मा.टकले – कार्यकारी अभियंता हे अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सी.एस.आर. Activity राबविणेकामी सी.एस.आर. कक्षाकरिता Assistant CSR सल्लागार ६ महिने कालावधी करिता एकत्रित मानधनावर नेमणेबाबत.

विषय क्र.२५) कोरोना विषाणू (Covid 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी QUARANTINE (अलगीकरण) कामकाजासाठी होम गार्डस मानधन (कर्तव्य भत्ता) अदायगीस कार्योत्तर मान्यता तसेच येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.२६) "माझे कुटुंब – माझी जबाबदारी" या कोविड १९ नियंत्रणासाठी राबविण्यात येणा-या मोहिमेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या अंगणवाडी सेविका व आशा स्वयंसेविका यांना द्यावयाच्या भत्त्याबाबत.

विषय क्र.२७) प्रोत्साहन भत्ता – मा.स्थायी समिती ठराव क्र.७४८५ दि.१६/०९/२०२० मध्ये दुरूस्तीबाबत. – मा.संतोष कांबळे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२८) कामास मुदतवाढ देणेबाबत. - मा.संतोष कांबळे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२९) मा.स्थायी समिती ठराव क्र.७४२४ दि.०९/०९/२०२० मध्ये दुरूस्ती बाबत.-मा.संतोष कांबळे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३०) मा.स्थायी समिती ठराव क्र.७४१६ दि.०९/०९/२०२० मध्ये ठेकेदाराचे नावातील दुरूस्ती बाबत. - मा.संतोष कांबळे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.पंकज भालेकर अनुमोदक – मा.संतोष कांबळे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक रामदास बोकड, जेष्ठ चित्रपट, नाट्य अभिनेत्री आशालता वाबगावकर यांचे निधन व जेष्ठ आंबेडकरवादी विचारवंत भाऊ लोखंडे तसेच शहरातील करोनामुळे निधन झालेल्या व्यक्तींना श्रध्दांजली वाहण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

----------

दिनांक १६/०९/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १८९) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ७४८७ | विषय क्रमांक –१

दिनांक – २३/०९/२०२० | विभाग– मध्य.सा.भांडार, वैद्यकिय

सुचक – मा.अभिषेक बारणे | अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/३४२/२०२०, दि.०१/०७/२०२०

विषय - Standard Q Covid-19 Ag detection Kit खरेदीबाबत..

विषय क्र.१ चा विचार दि.०७/१०/२०२० चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४८८ | विषय क्रमांक –२

दिनांक – २३/०९/२०२० | विभाग–आरोग्य मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे | अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/११/कावि/२३१/२०२०, दि.२८/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे–

भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3) क नुसार कोरोना विषाणुचा (COVID 19) प्रादुर्भाव लक्षात घेता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अस्तित्वात असलेल्या कोविड केअर सेंटर (CCC) खाजगी रुग्णालय सेंटर/एन.जी.ओ./खाजगी संस्था यांना चालविणेस देणेकामी तसेच खाजगी ठिकाणी वरील संस्थामार्फत (CCC) चालविणेस देणेकामी Expression of Interst (EOI)3/2020-21 प्रसिध्द करणेत आले होते, त्यानुसार बी कॅटेगरी अंतर्गत कामाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | ड संख्या | स्थळ | मंजुर दर प्रति बेड/ प्रति दिवस | अंदाजित र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ट्रस्ट हेल्थ केअर | 100 | डी. वाय. पाटिल मुलींचे हॉस्टेल, रावेत | 699/- | 62,91,000/- |
| 2 | | 100 | मागास वर्गीय मुलांचे हॉस्टेल, मोशी | 699/- | 62,91,000/- |
| 3 | | 200 | सामाजिक न्यायविभाग, मुलांचे हॉस्टेल, मोशी | 543/- | 97,74,000/- |
| 4 | मे.आयकॉन हॉस्पिटल | 200 | घरकुल इमारत क्र. डी/5 | 543/- | 97,74,000/- |
| 5 | | 200 | घरकुल इमारत क्र. डी/6 | 543/- | 97,74,000/- |
| 6 | | 200 | घरकुल इमारत क्र. डी/7 | 543/- | 97,74,000/- |
| 7 | | 200 | घरकुल इमारत क्र. डी/8 | 543/- | 97,74,000/- |
| 8 | मे.डीवाईन हॉस्पिटल | 200 | घरकुल इमारत क्र.बी/10 | 543/- | 97,74,000/- |
| 9 | | 200 | घरकुल इमारत क्र. बी/12 | 543/- | 97,74,000/- |
| 10 | मे.डॉ.भिसे मल्टीस्पेशलीटी हॉस्पिटल | 200 | बालाजी लॉ कॉलेज, ताथवडे | 543/- | 97,74,000/- |
| 11 | | 300 | म्हाडा वसाहत, सी/11 म्हाळूंगे. | 500/- | 1,35,00,000/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 12 | | 300 | म्हाडा वसाहत, बी/12 म्हाळूंगे. | 500/- | 1,35,00,000/- |
| 13 | मे.रुबी अलकेअर सर्विसेस | 300 | म्हाडा वसाहत, बी/11, म्हाळूंगे | 500/- | 1,35,00,000/- |
| 14 | मे.रुबी अलकेअर सर्विसेस | 300 | म्हाडा वसाहत, ऐ/11,म्हाळुगे | 500/- | 1,35,00,000/- |
| 15 | मे.बी.व्ही.जी. इंडिया ली. | 200 | बालेवाडी स्पोर्टस कॉम्पलेक्स | 543/- | 97,74,000/- |
| 16 | | 300 | पी.सी.सी.ओ.पी. हॉस्टेल, आकुर्डी | 500/- | 1,35,00,000/- |

त्यानुसार उपरोक्त 16 संस्थांना कोविड 19 या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव लक्षात घेता कोविड केअर सेंटर तातडीने सुरु करणेस मंजुर दराने कामाचा आदेश देणेत आला असुन, प्रति बेड/प्रति दिवस मंजुर दरानुसार तीन महिने कालावधी करीता उपरोक्त नमुद अंदाजपत्रकीय रकमेसह प्रत्यक्ष होणा-या खर्चास तसेच त्यांचे बरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४८९ विषय क्रमांक –३

दिनांक – २३/०९/२०२० विभाग–आरोग्य मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचेपत्रक्र.आमुका/३/कावि/२६५/२०२०, दि.०३/०९/२०२०

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे–

भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3) क नुसार कोरोना विषाणुचा (COVID19) प्रादुर्भाव लक्षात घेता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अस्तित्वात असलेल्या कोविड केअर सेंटर(CCC) खाजगी रुग्णालय सेंटर/एन.जी.ओ./खाजगी संस्था यांना खाजगी ठिकाणी (CCC) चालविणेस देणेकामी Expression of Interst (EOI)5/2020-21 प्रसिध्द करणेत आले होते, त्यानुसार ए कॅटेगरी अंतर्गत कामाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | बेड संख्या | स्थळ | मंजुर दर प्रति बेड/ प्रति दिवस | अंदाजित र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १. | आयुश्री मल्टीस्पेशालिटीहॉस्पीटल | १०० | Infrastructure located at Pink City Road, Next to Euro School, Wakad | १४९३/- | १,३४,३७,०००/- |
| २. | Xtensible Software Technologies Pvt.Ltd. | १०० | Hotel Crystal Court, Kharalwadi, Pimpri, Pune – 18 | १४९०/- | १,३४,१०,०००/- |

त्यानुसार उपरोक्त २ संस्थाना कोविड १९ या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव लक्षात घेता कोविड केअर सेंटर तातडीने सुरु करणेस मंजूर दराने कामाचा आदेश देणेत आला असून, प्रति बेड/प्रति दिवस मंजुर दरानुसार तीन महिने कालावधीकरीता सदर नमुद अंदाजपत्रकीय रकमेसह प्रत्यक्ष होणा-या खर्चास तसेच त्यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४९० विषय क्रमांक –४
दिनांक – २३/०९/२०२० विभाग–भूमि आणि जिंदगी
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भूमि/९/कावि/२००/२०२०, दि.३१/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे–

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघास ५ वर्षे कालावधीसाठी भाडे पटटयाने मेडीकल स्टोअर्ससाठी (क्षेत्र–२०x१२ फुट) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६६(१८) चे अनुषंगाने तसेच कलम ७९(क)व ७९(ड) नुसार मा.स्थायी समिती ठराव क्र.७५७१ दि.५/८/२०१४ नुसार मा.महापालिका सभा ठराव क्र.६३४ दि.१०/२/२०१५ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. नगररचना विभागाने निश्चित केलेल्या दरानुसार कर्मचारी महासंघ मनपास वेळेवर नियमित भाडे भरत आहे. सदर मेडीकल स्टोअर्सची मुदत दि.३०/९/२०२० रोजी संपुष्टात येत असून पुढील ५ वर्षे मुदत वाढ मिळणेबाबत पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघाने कळविलेले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघास मेडीकल स्टोअर्ससाठी ५ (पाच) वर्षे भाडे कराराने व नगररचना विभाग ठरविल, त्या भाडे दराने निविदा न मागविता थेट पध्दतीने मुदतवाढ देणेबाबत मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे मेडीकल स्टोअरला मुदतवाढ मिळणेबाबत कर्मचारी महासंघाची मागणी आहे. सदरची संघटना मनपाकडील शासन मान्यता प्राप्त संघटना आहे. कर्मचारी महासंघ नियोजित मेडीकल स्टोअर्स मधून मनपाचे अधिकारी व कर्मचारी तसेच सेवानिवृत्त मनपा कर्मचारी यांना “ना नफा ना तोटा” या तत्वावर औषधे उपलब्ध करुन देत आहेत. त्याचा फायदा मनपा कर्मचारी व त्यांचे कुटुंबियांना होत आहे. सदरची बाब मनपाचे कर्मचारी वर्गासाठी कल्याणकारी आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६६(१८) नुसार महापालिकेस स्वेच्छा निर्णयानुसार महापालिका कर्मचा-यांच्या किंवा त्यांच्या वर्गाच्या कल्याणासाठी अन्य कोणत्याही उपाय योजना करणेबाबत तरतुद आहे. उपरोक्त बाबींचा विचार करता मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे “ना नफा ना तोटा” या तत्वावर मेडीकल स्टोअर्सला पुढील ५(पाच) वर्षे मुदतवाढ देणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७९(ब) नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४९१ विषय क्रमांक –५
दिनांक – २३/०९/२०२० विभाग– मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मभां/०५/कावि/७९८/२०२०, दि.२७/०८/२०२०

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे–

पिंपरी चिंचवड मनपाच्या विविध विभागांसाठी आवश्यक संगणक संच खरेदीकामी केंद्र शासनाच्या गव्हर्मेंट ई-मार्केट प्लॅटसवर GeM Bid No.GEM/2020/B/619221 प्रसिध्द करुन मागविण्यात आलेल्या आहेत. सदर संगणक संचाची कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर CCC, DCHC, DCH व विविध

विभागांसाठी आवश्यकता असल्यामुळे मा.आयुक्तसो यांनी संगणक संच खरेदीस मान्यता दिलेली आहे. प्राप्त निविदांमध्ये मे.इनमॅक कॉम्प्युटर्स प्रा.लि., मुंबई यांनी सादर केलेला निविदा दर र.रु.३७,२००/-प्रती संगणक संच सर्व करांसह हा लघुत्तम प्राप्त झाला असुन स्विकृत करण्यात आला आहे. त्यानुसार मनपाच्या विविध विभाग, रुग्णालये, कोविड केअर सेंटर्स यांना आवश्यक १४० संगणक संच मे.इनमॅक कॉम्प्युटर्स प्रा. लि., मुंबई यांच्याकडून त्यांनी सादर केलेल्या दरानुसार करारनामा करुन खरेदी करणेस व याकामी होणारा एकूण र.रु.५२,०८,०००/- (अक्षरी र.रू.बावन्न लाख आठ हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४९२ विषय क्रमांक – ६

दिनांक – २३/०९/२०२० विभाग–पर्यावरण अभियांत्रिकी

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/१/कावि/९३/२०२०, दि.१४/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे–

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV4/2-2019-20 अन्वये उर्जा बचतीच्या अंतर्गत पिं.चिं. मनपा च्या क, ड, ई व ह प्रभागातील मैलाशुध्दीकरण केंद्रे व मैला पाणी पंप हाऊसचे इमारतीवर उर्जा निर्मितीकामी सोलर सिस्टीम बसविणे व अनुषंगीक कामे करणेकामी मे.इलेक्ट्रो मेकॅनिक्स यांचेकडुन निविदा र.रु.६६,९६,४२७/- (अक्षरी र.रू.सहासष्ठ लाख शहान्नव हजार चारशे सत्तावीस फक्त) वर निविदा दर प्राप्त झाले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदारांकडून र.रु.६६,९६,४२७/- पेक्षा -१६.१८% कमी दराने म्हणजेच र.रु.५६,१२,९४५/- पर्यंत काम करुन घेणेस व नियमानुसार निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवाकर वेगळा अदा करणेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागु असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेसोबत करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४९३ विषय क्रमांक –७

दिनांक – २३/०९/२०२० विभाग–वैद्यकिय

सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मसाभां/२/कावि/६४६/२०२०, दि.१४/०९/२०२०

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे–

चीन देशामध्ये कोरोना विषाणू आजराचा उद्रेक सुरु आहे. तसेच चीन व्यतिरिक्त इतर अनेक देशांमध्येही या आजाराचे रुग्ण आढळले आहेत. पुणे जिल्हा मध्येही कोरोना बाधित रुग्ण आढळुन

आलेले असुन सद्यस्थितीमध्ये पिं.चिं.मनपा मध्ये कोरोना बाधित व संशयित रुग्ण आढळुन आले आहेत. कोरोनाबाधित व संशयित रुग्णांपासून रोगाचा प्रसार थांबविणे व त्वरीत प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता सदरील कोरोना बाधित अथवा संशयित रुग्णयांना विलगीकरण कक्षामध्ये ठेवणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या वाय.सी.एम.एच रुग्णालय, नविन भोसरी रुग्णालयाच्या नविन इमारतीमध्ये विलगीकरण कक्षसुरु करण्यात आलेले आहेत तसेच नवीन जिजामाता इतर ठिकाणी कक्ष तयार करण्याची कार्यवाही चालू आहे. सदर कक्षामधील रुग्ण/अधिकारी/कर्मचारी यांना सकाळचा नाश्ता, दोन वेळचा चहा व दोन वेळचे जेवण या प्रकारचा आहार उपलब्ध करुन देणेबाबत ज्येष्ठ वैदयकिय अधिकारी नविन भोसरी रुग्णालय यांनी दिनांक 25/3/2020 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. मनपा रुग्णालयातील कोरोना विषाणू बाधित रुग्णांना आहार पुरविणेकामी मे.क्वॉलिटी केटर्स, वाय.सी.एम. रुग्णालय याच्यांकडुन दरपत्रक मागविणेत आले आहेत. मा.आयुक्तसो यांनी सदर प्रस्तावास मान्यता दिली आहे. आहाराचा तपशिल खालील प्रमाणे -

| अ.क्र. | वेळ | अहाराचा तपशिल | प्रमाण | सामग्री | दरसर्व करासहित पोहच |
|---|---|---|---|---|---|
| १ | चहा सकाळी– ८.३० वाजता | चहा १ कप | १५०मिली (१ कप) | साखर -१० ग्रॅम,चहापत्ती- ५ ग्रॅमदुध-२५ मिली | र.रु १०/- |
| २ | नाश्ता सकाळी- ८.३० वाजता | पोहे/उपमा | १ प्लेट | पोहे/रवा/सुजी- ७५ ग्रॅमकांदा- १० ग्रॅम | र.रु ३०/- |
| ३ | दुपारचे जेवन – दु.१.०० वाजता | भात,चपातीडाळ/उसळ/पाले भाजीसॅलेड-काकडी, टॅमेटो,कांदा | १ वाटी ४१,१/२ वाटी,३/४ वाटी१ छोटी प्लेट | भात-४० ग्रॅम, गव्हाचे पीठ-१६० ग्रॅमडाळ/कडधान्य- ३० ग्रॅम, तेल-५ ग्रॅमपालेभाजी१००ग्रॅम,काकडी/टॉमेटो२०ग्रॅम, कांदा-१० ग्रॅम | र.रु ७५/- |
| ४ | दुपारचा चहा- दु.४.३० वाजता | चहा (१) कप | १५० मिली | साखर -१० ग्रॅम, चहापत्ती- ५ ग्रॅमदुध२५ मिली, गहू-४० ग्रॅम | र.रु १०/- |
| ५ | रात्रीचे जेवन- सायं.८.०० वाजता | भातचपातीडाळ/उसळ/पाले भाजी | १ वाटी४१,१/२ वाटी,३/४ वाटी | भात-४० ग्रॅम, गव्हाचे पीठ-१६० ग्रॅमडाळ/कडधान्य- ३० ग्रॅम, तेल-५ ग्रॅम, इतर कंदमुळे ५० ग्रॅम | र.रु ७५/- |
| | | | | पॅकिंग चार्ज | र.रु ५०/- |
| | | | | एकुण सर्व करासहित पोहच | र.रु २५०/- |

माहे मार्च ते मे २०२० साठी मे.क्वालीटी केटरर्स यांना र.रु.४८,३१,३०२/-ची बिले आदा करणेत आलेली आहेत. सदर खर्चास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.७२०७ दि.१०.०७.२०२० अन्वये र.रु.५० लाखाचे खर्चास मान्यता घेणेत आलेली आहे. माहे जुन आणि जुलै (वायसीएम आणि जिजामाता) अखेरीस मे.क्वालीटी केटरर्स यांना पुरवठा आदेश क्र.मसाभां/२/२६४/२०२० दि.१४.०४.२०२० अन्वये देणेत आलेले होते. सदर झालेल्या कामाचे बिल र.रु.२५०/- प्रमाणे र.रु.४८,१९,५१७/- त्यांना अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४९४ विषय क्रमांक –८
दिनांक – २३/०९/२०२० विभाग–स्थापत्य क मुख्यालय
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शितल शिंदे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/२९६/२०२०, दि.१४/०९/२०२०

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे–

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.67/5/2019-20 अन्वये प्रभाग क्र.६ मध्ये धावडेवस्ती, भगतवस्ती व परिसरातील नाल्यांची सुधारणा करणेकामी मे.मल्हार राज कन्स्ट्रक्शन नि.र.रू.30,41,206/- (अक्षरी र.रु.तीस लाख एक्केचाळीस हजार दोनशे सहा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,63,971/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,63,971/- पेक्षा 30.33% कमी म्हणजेच र.रु.20,64,999/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.24,735/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.52,500/- = एकुण र.रु.21,42,234/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवाकर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४९५ विषय क्रमांक –९
दिनांक – २३/०९/२०२० विभाग– माध्यमिक शिक्षण
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.माध्य/शि/३/कावि/१७६/२०२०, दि.१४/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे–

शालांत परीक्षा मार्च २०२०, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक विदयालयातील इ.१० वी शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ८० टक्के पेक्षा जास्त गुण संपादन करणा-या गुणवंत विदयार्थ्यांना व दिव्यांग विद्यार्थ्यांना बक्षीस रक्कम अदा करणेकामी तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या १८ माध्यमिक विदयालयातील इ.१० वीच्या विदयार्थ्यांना ८०% पेक्षा जास्त गुणसंपादन करणा-या गुणवंत विदयार्थ्यांचा बक्षिस रक्कम अदा करणेत येते. माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२० चा निकाल दिनांक २९/०७/२०२० रोजी इंटनेटवर प्रसिध्द झालेला आहे. प्रत्याक्षात गुणपत्रिका १८/०८/२०२० रोजी संबधित विद्यालयांना देण्यात आलेल्या आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक विदयालयाचा निकाल ९४.११% लागला आहे. सन २००८-२००९ पासुन सदरची योजना पिंपरी चिंचवड महानगरपालिके तर्फे राबविणेत येत आहे. सन २०१५–१६ या शैक्षणिक वर्षापासुन सदर योजनेत व धोरणात बदल करून त्यास महापालिका सभेने दिनांक २०/६/१५ च्या

ठरावान्वये मान्यता दिलेली आहे त्या ठरावाच्या व धोरणाच्या अनुषंगाने सन २०२० – २१ या शैक्षणिक वर्षात सदरची योजना राबविण्यास तसेच माध्यमिक शिक्षण विभागाकडील कार्यरत असलेल्या १८ माध्यमिक विदयालयातील जे विदयार्थी ९०% पेक्षा जास्त गुण घेतील अशा विदयार्थ्यांना प्रत्येकी १,००,०००/- प्रमाणे २० विदयार्थी व ८५% ते ८९.९९% पर्यंत प्रत्येकी ५०,०००/- प्रमाणे ९० विदयार्थ्यांना, व ८०% ते ८४.९९% विदयार्थ्यांना प्रत्येकी २५,०००/- प्रमाणे १४३ विदयार्थ्यांना व जे दिव्यांग विदयार्थी आहेत त्यांना ३५% पेक्षा जास्त गुण मिळविणा-या व ४०% अंपगत्व असलेल्या विदयार्थ्यांना प्रत्येकी ५०,०००/- प्रमाणे ०९ विदयार्थी असे एकुण २६२ विदयार्थ्यांना र.रू.१,०५,२५,०००/- इतका खर्च येणार असुन २६० विद्यार्थ्यांना ECS द्वारे र.रू.१,०४,५०,०००/- देण्यात येणार असुन मुख्याध्यापक यांच्या पत्राच्या अनुषंगाने कु.लगाडे रोहित विश्र्वास, माध्यमिक विद्यालय पिंपळे गुरव हा विद्यार्थ्यां आय.सी. यु. मध्ये असल्याने त्यांच्या नावाचे स्वतंत्र बॅक खाते नसल्याने व कु.साक्षी सुरेश लोखंडे माध्यमिक विद्यालय नेहरूनगर हिचे मुख्याध्यापकाने कळविल्या प्रमाणे स्वतंत्र खाते नसल्याने त्यांना देय असलेली अनुक्रमे र.रू.५०,०००/- वर.रु.२५,०००/- असे एकुण र.रू.७५,०००/- चेक द्वारे अदा करणे क्रमप्राप्त आहे. तरी एकुण २६२ विद्यार्थ्यांना अदा करावयाचे एकुण र.रू.१,०५,२५,०००/- खालील प्रमाणे

| अ.क्र. | गुण टक्केवारी | प्रत्येकी बक्षीस र.रू. | विद्यार्थी संख्या | एकुण र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | ९०% पेक्षा जास्त | १००००० | २० | २०००००० |
| २ | ८५% ते ८९.९९% | ५०००० | ९० | ४५००००० |
| ३ | ८०% ते ८४.९९% | २५००० | १४३ | ३५७५००० |
| ४ | दिव्यांग विद्यार्थी | ५०००० | ९ | ४५०००० |
| | एकुण | | २६२ | १०५२५००० |

उपरोक्त प्रमाणे माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२० मध्ये झालेल्या परीक्षेमध्ये ८०% पेक्षा जास्त गुण मिळालेल्या २५३ विदयार्थी व दिव्यांग ०९ असे एकुण २६२ विदयार्थ्यांना प्रोत्साहनपर एकुण र.रू.१,०५,२५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.सन २०२०-२१ मध्ये माध्यमिक विभागाकडील “गुणवंत विद्यार्थीसत्कार सभारंभ”या लेखा शिर्षावर र.रू.७०,००,०००/- तरतुद आहे. सदर तरतुदीमधुन अद्याप पर्यंत काहीही रक्कम खर्च पडलेली नाही. परंतु अंदाजे खर्च र.रू.१,०५,२५,०००/- खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे सदर शालांत परीक्षा मार्च २०२० मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील माध्यामिक शाळेतील ८०% पेक्षा जास्त गुण मिळविणा-या व ३५% पेक्षा जास्त गुण मिळविण्या दिव्यांग गुणवंत विद्यार्थांना यांना दयावयाचे बक्षीस रक्कम खालील प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

**क्र.१)**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियनकलम १०१ अनुसुची ५ मधील प्रकरण ७ तरतुद क्र.२(१) नुसार सन २०२०-२१ करिताअसणा-या “विविध उपक्रम “या लेखाशिर्षावर असणारे

र.रू.५,२५,००,०००/-तरतुदीमधुन “गुणवंत विदयार्थी सत्कार” या लेखाशिर्षावर र.रू.४०,००,०००/- तरतुद वर्ग करणे.

**क्र.२)**माध्यमिक शिक्षण विभागाकडील सन २०२०- २१ गुणवंत्त विद्यार्थी सत्कार ” या तरतुदीमधुन खर्च टाकण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४९६ विषय क्रमांक –१०

दिनांक – २३/०९/२०२० विभाग – स्थापत्य फ मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/ग-मुख्य/१४५/२०२०, दि.११/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे–

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/81/04/2019-20 अन्वये प्रभाग क्र.२४ मधील भिंगारे कॉर्नर ते रत्नदीप कॉलनी (वाकड रोड) रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणेकामी मे.ए.आर.कन्स्ट्रक्शन नि.र.रू.8,32,43,803/- (अक्षरी र.रु.आठ कोटी बत्तीस लाख त्रेचाळीस हजार आठशे तीन फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.8,27,65,384/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.8,27,65,384/- पेक्षा 21.21% कमी म्हणजेच र.रु.6,52,10,846/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.3,21,469/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.1,56,950/- = एकुण र.रु.6,56,89,265/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवाकर अदा करणेस तसेच निविदा अटीं नुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४९७ विषय क्रमांक –११

दिनांक – २३/०९/२०२० विभाग–करआकरणी व करसंकलन

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.कर/मुख्य/०३/कावि/३६१/२०२०, दि.१४/०९/२०२०

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे–

राष्ट्रीय लोक अदालत बाबत जनजागृती मोहिमे अंतर्गत रिक्षा स्पिकरसेट सह भाड्याने घेणेबाबत मा.आयुक्त यांचे कडील आदेश क्र.कर/मुख्य/09/कावि/456/2019 दिनांक 19/11/2019 रोजी आदेश देण्यात आलेले आहे. मिळकत कराची जास्तीत जास्त वसुली होण्याच्या दृष्टीने मनपा कर शास्ती (दंड) लागू झालेल्या सर्व मिळकतधारकांना सवलत योजनेचा लाभ देणेबाबत दिनांक 14/12/2019 रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर लोक अदालतीमध्ये

जास्तीत जास्त मिळकत धारकांनी सहभाग नोंदवून सवलत योजनेचा लाभ घेणेकामी सदर योजनेची व्यापक प्रसिद्धी होणेचे दृष्टीने दिनांक 11/12/2019 ते 14/12/2019 अखेर एकूण 04 दिवस 04 ऑटो रिक्षा स्पिकरसेट सह प्रति दिन भाडेतत्वावर घेऊन त्यामार्फत योजनेची प्रसिद्धी करण्यात आलेली आहे. सदरची प्रसिद्धी तातडीने करावयाची असल्याने व वेळेची मर्यादा असल्याने कामकाजाची निकड पाहता थेट पद्धतीने कामकाज करून घेण्यात आली आहे. प्रति दिन र.रु.3,000/- प्रमाणे स्पिकर सेट सह 04 ऑटो रिक्षांचे एकूण 04 दिवसांचे भाडे इत्यादीसाठी र.रू.48,000/- (अक्षरी र.रू.अठ्ठेचाळीस हजार फक्त) इतका थेट पद्धतीने खर्च झालेला आहे. Star Of India Tours & Travlas (चंद्रकांत गांगड) यांना बिल अदा करणेत आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४९८ | विषय क्रमांक –१२

दिनांक – २३/०९/२०२० | विभाग–मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे | अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/०४/कावि/११३८/२०२०, दि.१४/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे–

भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम 1897, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसुचना दि.14/03/2020 व आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, कलम 41 व50 नुसार व महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3) (क) नुसार कोरोना विषाणुचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी आवश्यक फुड पॅकिंग कंटेनर तातडीची बाब असल्याने मे.इंडीया सेल्स कॉर्पोरेशन, मोरवाडी पिंपरी यांचेकडुन थेट पध्दतीने एकुण 450 मिलीचे 5,86,000 नगासाठी सर्व करांसह र.रू.14,63,593/- 750 मिलीचे 2,93,000 नगासाठी र.रू.10,10,732/- फुड पॅकिंग कंटेनर खरेदीकामी एकुण र.रु.24,74,325/- (अक्षरी र.रू.चोवीस लाख चौ-याहत्तर हजार तीनशे पंच्चवीस फक्त) इतका खर्च झालेला आहे. सदरची खरेदी महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम63(6) व कलम67(3) क नुसार व अनुसुची ड प्रकरण क्रमांक 5(2)(2) नुसार कार्योत्तर मान्यता व मे.इंडीया सेल्स कॉर्पोरेशन यांचे बिल अदायगीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४९९ | विषय क्रमांक –१३

दिनांक – २३/०९/२०२० | विभाग– वाय.सी.एम.एच.

सुचक – मा.शशिकांत कदम | अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/५/कावि/१०६०/२०२०, दि.१५/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे–

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयासवैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यास महाराष्ट्र शासन वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, यांचे कडील

शासन निर्णय क्रमांक पीजीएम१०१७/प्र.क्र.१२९/१७/भाग-२/शिक्षण-२, दिनांक– ०७ मार्च, २०१९ या शैक्षणिक वर्षापासून नमुद विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडील पत्र क्र.MUHS/Acad/E-1/PG/39/ 2165/1065/2020, Date-10/06/2020 नुसार सन २०२०-२०२१ करीता विद्यार्थी प्रवेशक्षमता खालील तक्त्यात नमुद केलेली आहे.

| अ.क्र. | विषय | पत्रक्रमांक | दिनांक | मंजुर प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|---|
| १ | मानसोपचारशास्त्र | MCI-46(22)/10(A)/2018-Med./182076 | 27/02/2019 | ०३ |
| २ | विकृतीशास्त्र | MCI-46(22)/10(A)/2018-Med./182084 | 27/02/2019 | ०३ |
| ३ | बालरोग | MCI-46(22)/10(A)/2018-Med./182060 | 27/01/2019 | ०४ |
| ४ | अस्थिरोग | MCI-46(22)/10(A)/2018-Med./182687 | 27/02/2019 | ०४ |
| ५ | स्त्रीरोगवप्रसुतिशास्त्र | MCI-46(22)/10(A)/2018-Med./182068 | 27/02/2019 | ०३ |
| ६ | कान/नाक/घसा | MCI-46(22)/10(A)/2018-Med./166887 | 24/02/2019 | ०३ |
| ७ | भुलशास्त्र | MCI-46(22)/10(A)/2018-Med./182092 | 27/02/2019 | ०४ |
| ८ | जनरल सर्जरी | MCI-46(22)/10(A)/2019-Med./161259 | 04/11/2019 | ०६ |
| ९ | मेडीसीन | MCI-46(22)/10(A)/2019-Med./185470 | 31/01/2020 | ०६ |

तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडील पत्र क्रमांक MUHS/PB/PG/ P1/FTA/293/2019, दिनांक २८/०३/२०१९ नुसार सन २०१९-२० पहिल्यांदा पदव्युत्तर संस्थेला परवानगी दिलेली आहे. या पत्रातील अटी व शर्ती मधिल मुद्दा क्रमांक ५ मध्ये संलग्नि करणाचे नुतनीकरण केल्या शिवाय पुढील सन २०२१-२२ च्या बॅचला प्रवेश देता येणार नाही असे नमुद केलेले आहे. त्यानुसार सन २०२०-२०२१ करीता एकुण ३६ विद्यार्थ्यांनी विविध विभागात प्रवेश घेतलेला आहे. मा.कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी परिपत्रक क्रमांक.२५/२०२० दिनांक१८/०८/२०२० अन्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक अधिनियम १९९८ कलम ६८ व ६९ नुसार संलग्निकरणाचे नुतनीकरण/संलग्निकरणाचे विस्तारी करणसाठी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० पुर्वी संबंधित महाविद्यालयाने विहीत अर्ज व शुल्क विद्यापीठास सादर करणे बाबत कळविलेले आहे. संलग्निकरणाचे नुतनीकरणाचे/संलग्निकरणाचे विस्तारीकरणाचा विहित नमुन्यातील अर्ज विहित मुदतीत सादर न केल्यास विलंब शुल्क लागु होईल असे सदर परिपत्रकात नमुद केलेले आहे.सदर परिपत्रकामध्ये संलग्निकरणाचे नुतनीकरणासाठी र.रू.५,००,०००/-किंवा ट्युशन फी चे १% यापैकी जी रक्कम जास्त असेल ती रक्कम तसेच संलग्निकरणाचे विस्तारीकरणसाठी सुध्दा याच प्रमाणे र.रू.५,००,०००/- किंवा ट्युशन फी चे १% यापैकी जी रक्कम जास्त असेल ती रक्कम महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना अदा करावी लागणार आहे. सदरची रक्कम महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना RTGS द्वारे The Registrar, Maharashtra University of Health Sciences, Nashik, Payable at Nashik. यांचे नावे अदा करावी लागणार आहे. सबब, उपरोक्त कामी ०९ विषयांचे सन२०२१-२०२२ साठी संलग्निकरणाचे नुतनीकरण करणेकामी र.रू.५,००,०००/- (अक्षरी र.रू.पाच लाख फक्त) व

संलग्निकरणाचे विस्तारी करणासाठी र.रू.५,००,०००/- (अक्षरी र.रू. पाच लाख फक्त) असे एकुण र.रू.१०,००,०००/- (अक्षरी र.रू. दहा लाख फक्त) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना RTGS द्वारे देणे कामी सन२०२०-२०२१ च्या अंदाज पत्रकातील यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकडील “पी.जी.आय. वाय.सी.एम.एच. पि.सी.एम.सी. करीता विविध शासकीय नियामक संस्था व विद्यापीठ इ चे शुल्क भरणे” या लेखाशिर्षातील ररू.१,५०,००,०००/- मधुन खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५०० विषय क्रमांक –१४

दिनांक – २३/०९/२०२० विभाग– जलनि:सारण

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/७४२/२०२०, दि.१४/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे–

